# तरुणाईची ऊर्जा हे सर्वांत मोठे आव्हान - प्रमोद चौधरी

प्रतिनिधी, पुणे

'सध्याच्या तरुणाईची ऊर्जा ही जशी संपत्ती आहे, तसेच ते एक मोठे आव्हान आहे. या ऊर्जेला योग्य दिशा मिळाली नाही, तर ती चुकीच्या दिशेला वळते आणि त्यातून नक्षलवादासारख्या समस्याही वाढू शकतात,' असे मत प्राज इंडस्ट्रीजचे अध्यक्ष प्रमोद चौधरी यांनी 'स्वामी विवेकानंद मातृभूमी गौरव पुरस्कार' प्रदान समारंभात रविवारी व्यक्त केले.

स्वरूपवर्धिनी आणि तात्यासाहेब नातू फाउंडेशनतर्फे दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सचे (डिक्की) अध्यक्ष मिलिंद कांबळे यांना स्वामी विवेकानंद मातृभूमी गौरव पुरस्कार देण्यात आला. या वेळी सामाजिक समरसता मंचाचे राष्ट्रीय संयोजक भिकुजी इदाते, स्वरूपवर्धिनीचे कार्याध्यक्ष कल्याण वर्दे, तात्यासाहेब नातू फाउंडेशनचे विश्वस्त संस्थापक शारंग नातू आदी उपस्थित होते.

या वेळी चौधरी म्हणाले, 'सध्या आर्थिक सबलीकरण हा विकासातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. विकासाच्या प्रक्रियेत वरवरच्या मलमपट्टीपेक्षा समस्येच्या मुळाशी जाऊन त्यावर उपाय करणे आवश्यक आहे.

भारताची प्रगती झपाट्याने होते आहे, त्याचे कारण मिलिंद कांबळे यांच्यासारखे उद्योजक आहेत. आता दलित आणि आदिवासींनी एकत्र येऊन काम केल्यास प्रगतीचे टप्पे गाठणे अधिक सोपे होईल.'

इदाते म्हणाले, 'हिंदू समाज हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले या विचारवंतांच्या चिंतनाचा विषय होता. हिंदुत्वाचा सामाजिक आशय पोहोचवण्यासाठी सामाजिक समरसता साधणे आवश्यक आहे. समरसता साधण्यासाठी जातीयवादाचे विष पचवावे लागेल.'

पुरस्काराला उत्तर देताना कांबळे म्हणाले, 'सध्याचे नेतृत्व हे आजच्या दलित तरुणांच्या भावविश्वापासून खूप दूर आहे. तरुणाई अनेक पावलं पुढे आहे. त्यांचे विचार वेगळे आहेत. अशा परिस्थितीत दलित तरुणांच्या मनातली पोकळी भरून काढण्याचे काम डिक्कीने केले. सवलती नकोत संधी द्या, या तत्त्वावर डिक्की काम करते आहे.'